**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४**
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004

Phones: Chairman 0231-2690829 Secretary 0231- 2691405 FAX : [0231] 2690758
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/लेखा/टंविफीमाफी/ 135
कोल्हापूर - 416004
दिनांक - 12/04/2021

प्रति,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय - सन 2017-18, 2018-19 आणि 2019-20 मधील टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त आणि अवेळी पावसामुळे बाधित क्षेत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना ऑनलाईन माहिती देणेसाठी मुदतवाढ**

संदर्भ - रा.मं. पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./अंदाजपत्रक/टंविफीमाफी 17-18 व 18-19/1796 दि. 09/04/2021

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सन २०१७-१८, २०१८-१९ मधील इ.१० वी व इ.१२ वीच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीस पात्र असलेल्या आणि अद्याप परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती न झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुक्लप्रतिपूर्ती करणेसाठी तसेच सन २०१९-२० मधील अवेळी पावसामुळे ३४ जिल्ह्यातील ३४९ तालुक्यातील बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी इ.१०वी साठी **http://feerefund.mh-ssc.ac.in** आणि इ.१२ वी साठी **http://feerefund.mh-hsc.ac.in** ह्या लिंक उपलब्ध करून ऑनलाईनद्वारे माहिती मागविणेस ९ एप्रिल,२०२१ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती.

सदर नवीन प्रणालीबाबत येणाऱ्या अडचणींचा विचार करून तसेच विद्यार्थ्यांची माहीती उशिरा प्राप्त होत असल्याचे अनेक माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी नमूद केल्याने राज्य मंडळ, पुणे यांचेकडून ऑनलाईनद्वार माहीती भरण्यास **दि. ३० एप्रिल,२०२१** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

(श्री देविदास कुलाळ)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहसाठी -

1. मा.सचिव, राज्य मंडळ, कोल्हापूर
2. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर
3. शिक्षणाधिकारी (माध्य.) सातारा, सांगली, कोल्हापूर

यांना कळविण्यात येते की, तातडीने सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेशी संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र लाभार्थींचे बँक खात्याची माहिती ऑनलाईनद्वारे विहित मुदतीमध्ये राज्य मंडळाकडे जमा करण्यात यावी.